# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **महिलांच्या आरोग्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा उपक्रम**
- **सॅनिटरी नॅपकिन वाटप व मासिक पाळी स्वच्छता जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न**

**मिरा-भाईंदर, २७ मार्च २०२५:** महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि मासिक पाळी स्वच्छतेविषयी समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने पुढाकार घेत महिला व बालकल्याण विभाग आणि चंद्रमोहन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उत्तरदायीत्व प्रकल्पांतर्गत अंतर्गत विशेष उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. या कार्यक्रमावेळी महिला आरोग्य या विषयावर नियोजनात्मक योजना राबविण्यावर भर दिला जाईल याबाबत मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी विशेष उल्लेख केला.

या उपक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ६ वी ते १० वी मधील एक हजार विद्यार्थिनी तसेच एक हजार गरजू महिलांना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. पुढे वर्षभर सॅनिटरी नॅपकिन्स या महिला आणि विद्यार्थिनींना देण्यात येणार आहेत. याचबरोबर मासिक पाळी स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करणारा जागृतीपर कार्यक्रम देखील घेण्यात आला. या उपक्रमाला विद्यार्थिनी व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे महिलांना मासिक पाळी स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगणे आणि आरोग्याची निगा राखण्यासाठी योग्य उपायांचा अंगीकार करण्यास प्रेरित करणे हे होते. डॉ. प्राजक्ता समेळ यांनी समाजात मासिक पाळीविषयी अस्तित्वात असलेल्या गैरसमज व अंधश्रद्धांवर प्रकाश टाकत, स्वच्छ सॅनिटरी नॅपकिन वापरण्याचे फायदे आणि स्वच्छतेचे नियम स्पष्ट केले.

या उपक्रमादरम्यान, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैज्ञानिक ज्ञानात वाढ व्हावी यासाठी स्मार्ट बोर्ड आणि STEM किट्सचे वाटप देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणात प्रोत्साहन देण्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महिला आणि विद्यार्थिनींसाठी सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रम सातत्याने राबवले जाणार असून, समाजाचा सर्वांगीण विकासासाठी महिलांचे आरोग्य आणि स्वच्छतेबाबतची जाणीव ही अत्यंत आवश्यक आहे.

कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, चंद्रमोहन फाउंडेशनच्या संचालक अनिशा भंडारी, लोपारेक्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक मनिष जैन, गोल्डन सोर्सचे वरिष्ठ उपाध्यक्ष सुदर्शन सिंग आणि प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्राजक्ता समेळ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या या स्तुत्य उपक्रमामुळे महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती वाढेल आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडून येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.